## प्रकरण - पाचवे

## कोल्हापूर गादी:- छत्रपती राजाराम महाराज

## (१८५० -१८७०)

**प्रस्तावना :-**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज यांनी इ.स. १६८९पर्यंत राज्यकारभार केला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या निघृण हत्येनंतर त्यांचा मुलगा राजपुत्र शाहू व पत्नी महाराणी येसूबाई यांना मोगल बादशहा औरगंजेब यांने कैदेत ठेवले. या खडतर परिस्थितीत छत्रपती राजाराम महाराज यांनी जिंजी मुक्कामी राहून स्वराज्याचा कारभार केलेला दिसतो. त्यांनी इ.स. १७०० पर्यंत स्वराज्याचा गाडा हाकलेला दिसून येतो. छत्रपती राजाराम महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी महाराणी ताराबाईसाहेब यांनी मोगल बादशहा औरगंजेबाबरोबर मोठया अटीतटीने लढा देऊन स्वराज्याचे रक्षण केले. या कामी सर्व छत्रपतींना स्वराज्यातील अनेक सरदारांची मदत करून प्राणपणाने लढून स्वराज्याचे रक्षण केले आणि योग्य वेळी संधी मिळताच आपल्यातील क्षात्रतेज दाखवून दिले.

महाराणी ताराबाईसाहेब यांनी त्यांचा पुत्र शिवाजी महाराज यांना स्वराज्याच्या गादीवर बसविले. ते अल्पवयीन राजपुत्र असल्याने महाराणी ताराबाई यांनी स्वराज्याचा राज्यकारभार आपल्या हाती घेतला होता. इ.स. १७०७ मध्ये मोगल बादशहा औरगंजेब याचा मृत्यू झाला. तेव्हा शाहजादा अज्जम यांने झुल्फिकार खानांच्याा सल्ल्यानुसार राजपुत्र शाहूंची सुटका केली. कारण त्यामागचा उद्देश हाच होता की, राजपुत्र शाहूच्या सुटकेने मराठेशाहीत दुफळी पडावी आणि मराठेशाही जिंकण्याचा मोगलांचा हेतू साध्य

व्हावा. राजपुत्र शाहूंच्या सुटकेदरम्यान शाहजादा अज्जम यांने मराठयांना मोगलाशी सलोख्याचे संबंध ठेवावे, असा तोंडी करार करून त्यांची कैदेतून मुक्तता केली होती. याकाळात पाटण महाल सरदार चांदजीराव यांचे पुत्र रामराव पाटणकर सांभाळत होते.

शाहू महाराज आणि सरदार रामराव पाटणकर यांची चिकेवाडी येथे भेट होऊन सरदार रामराव पाटणकर आपल्या फौजेसह शाहू महाराजांना सामील झाले.[१] यावेळी सरदार चांदजीराव पाटणकर हे हयात नव्हते. कारण त्यांची मुले रामराव व सुभानराव पाटणकर हे शाहू महाराजांना भेटल्याचा व त्यांची चांदजीरावांच्या काळी चालत असलेली इनामे व वतने चालू ठेवण्याचा महत्त्वाचा उल्लेख दिनांक १ एप्रिल, १७०८ च्या पत्रात येतो.[२] तसेच शाहू महाराजांनी सरदार रामराव पाटणकर व सरदार सुभानराव पाटणकर यांना पाटण महालीचा इनाम पूर्ववत चालू ठेवावा, असे इनाम पत्र दिले होते.[३] म्हणजेच शाहू महाराजांनाही सरदार पाटणकर यांचे स्वराज्यातील महत्त्व तसेच जिंजी मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना जो पाटण व अडुल येथील इनाम दिला होता. तो वंशपरंपरेने उपभोगत जाणे, अशी आज्ञा करून इनाम पूर्ववत ठेवला आहे.

शाहू महाराजांना स्वराज्यात आल्यावर छत्रपतींची गादी मिळवायची असेल तर अनेक मातब्बर सरदारांना आपल्याकडे असणे गरजेचे वाटत होते. अशा तत्कालिन मातब्बर सरदारांमध्ये पाटण महालातील सरदार पाटणकर यांचा ही समावेश होता. या मातब्बर सरदारांना आपल्या भेटीस बोलावून घेतले आणि त्याची स्वराज्याप्रती असलेली निष्ठा तसेच युध्दकौशल्य हे शाहू महाराजांनी जाणल्यामुळे त्यांनी त्यांचे ईनाम पूर्ववत चालू ठेवले. शाहू महाराज दक्षिणेत आल्यावर त्यांनी वऱ्हाड व खानदेश येथील मराठे सरदारांस आपल्या भेटीस बोलावून आपल्या गटात सामील करून घेतले. खानदेशातून शाहू महाराज अहमदनगर येथे येताच त्यांनी स्वत:ला मराठा

राज्यवंशाचे वारस घोषित केले. हा वृत्तांत महाराणी ताराबाईसाहेबांना कळताच त्यांनी राजश्री धनाजी जाधव व प्रतिनिधी यांचेबरोबर सैन्य देऊन शाहूवर स्वारी करण्यास पाठविले. उभय सैन्यांची गाठ पुण्याच्या उत्तरेस १५ कोसांवर खेडजवळ पडली व लढाई सुरू झाली.[४] परंतु युध्दावेळी सेनापती धनाजी जाधव यांनी शाहू महाराजांची बाजू घेतल्याने प्रतिनिधी एकटे पडले व त्यांना माघार घ्यावी लागली. ते साताऱ्याकडे परत आले. नंतर शाहू महाराज, धनाजी जाधव आणि सरदार रामराव पाटणकर यांनी चंदन व वंदन किल्ले हस्तगत केले. पुढे राजधानी सातारा हस्तगत करून शाहूंनी स्वत:ला स्वराज्याचे छत्रपती म्हणून घोषित केले.[५]

शाहू महाराजांनी दिनांक १२ जानेवारी, १७०८ रोजी स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला[६] आणि ते छत्रपती झाले. तद्नंतर महाराणी ताराबाईसाहेब या पन्हाळगडावर आल्या. पन्हाळगडावरून त्या स्वतंत्रपणे राज्यकारभार करू लागल्या. या काळात महाराणी ताराबाईसाहेबांनी शाहू महाराजांशी समझोता न करता त्यांच्याविरूध्द चढाई करण्याचे धोरण स्वीकारले. वाडीकर सावंत आणि कान्होजी आंग्रे या दोन मातब्बर सरदाराच्या मदतीने छत्रपती शाहू महाराजांचे पारिपत्य करण्याचे मनसुबे आखले. छत्रपती शाहू महाराजांच्या कोल्हापूर आणि पन्हाळा वरील मोहिमेने छत्रपती शाहू महाराजांना अधिक मुलूखाचे स्वामित्व मिळवून दिले होते. सेनापती धनाजी जाधव याच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव याची नेमणूक सेनापती म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी केली. पण छत्रपती शाहू महाराजांचा पक्ष घ्यावा की महाराणी ताराबाईंचा पक्ष, अशा द्विधा मन:स्थितीत चंद्रसेन जाधव होते. या परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांना वाटू लागले की, वारणेच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख महाराणी ताराबाईच्या स्वामित्वाखाली सोडावा. त्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी वारणा नदीच्या पलिकडील प्रदेशात असलेल्या आपल्या सैन्यास परत बोलाविले. या बदललेल्या निर्णयाचा फायदा महाराणी ताराबाईंना झाला. यावेळी महाराणी ताराबाईंचे सल्लागार रामचंद्रपंत अमात्य होते. त्यांचे मते

महाराणी ताराबाईंनी वारणेच्या पलीकडे न जाता कोल्हापूरास राजधानी करून छत्रपती शाहू महाराजांनी सोडलेल्या मुलूखाचा बंदोबस्त करावा. महाराणी ताराबाईंना हे मत पटून त्यांनी कोल्हापूर ही आपली राजधानी केली.

महाराणी ताराबाईंनी छत्रपती राजाराम महाराज यांची द्वितीय राणी राजसबाई व त्यांचा मुलगा राजपुत्र संभाजी यांना सत्तेपासून दूर ठेवले होते. पुढे राणी राजसबाई व त्यांचा मुलगा राजपुत्र संभाजी यांनी महाराणी ताराबाई व त्यांचा मुलगा राजपुत्र शिवाजी या दोघास कैदेत टाकून सत्ता बळकविण्याचा कट उभारला. गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल गडकरी व तुळाजी शितोळे यांनी त्यात सहभाग घेतला आणि किल्ले पन्हाळा येथे संभाजी राजे यास राज्यपदी बसविले. महाराणी ताराबाई व राजपुत्र शिवाजी यास कैदेत टाकिले, अशा रीतिने कोल्हापूरला राज्यक्रांती झाली आणि कोल्हापूरचे नवीन राज्य अस्तित्वात आले. महाराणी ताराबाईसाहेब कैदेत पडल्यामुळे छत्रपती शाहू महाराजांना विरोध करणाऱ्या व्यक्तींचा जोर कमी झाला. पुढील ४७ वर्षे ताराबाईंना कैदेतच काढावी लागली.[७] दिनांक १४ मार्च, १७२६ मध्ये कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी पहिले यांचा मृत्यू झाला.

दिनांक १३ एप्रिल, १७३१ साली सातारचे शाहू महाराज व कोल्हापूरचे संभाजी महाराज पहिले यांच्यात तह झाला. हा तह इतिहासामध्ये वारणेचा तह म्हणून प्रसिध्द आहे. या तहानुसार उत्तरेस वारणा, ईशान्येस कृष्णा व दक्षिणेत तुंगभद्रा यातील मुलूख कोल्हापूरच्या संभाजी महाराज पहिले यांच्याकडे राहिला.[८] दिनांक २० डिसेंबर, १७६० मध्ये कोल्हापूरच्या संभाजी महाराज पहिले यांचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी छत्रपती संभाजी महाराज पहिले यांना अपत्य नव्हते. त्यामुळे त्यांच्या पत्नी जिजाबाईसाहेब यांनी खानवटकर घराण्यातील मुलगा दत्तक घेतला आणि त्याचे नामकरण शिवाजी महाराज दुसरे केले.[९] ते अल्पवयीन असल्याने महाराणी

जिजाबाईच कोल्हापूरचा राज्यकारभार पहात होत्या. जिजाबाईसाहेब यांचा मृत्यू इ.स. १७७२ मध्ये झाला.[१०]

सातारच्या गादीचे छत्रपती शाहू महाराज यांनी सरदार पाटणकर व इतर मराठा सरदारांना हाताशी घेऊन मोगली प्रदेशामध्ये अनेक चढाया केल्या. यातून मराठयांचे वर्चस्व उत्तरेकडे वाढत गेलेले दिसून येते. परंतु शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर साताऱ्याच्या छत्रपतींचे वर्चस्व कमी होऊन पेशवे वरचढ झाले. पुढे पेशव्यांनी पुणे येथून मराठा राज्याचा राज्यकारभार पहावयास सुरूवात केली. सातारचे छत्रपती फक्त नामधारी राहिले. पेशव्यांना राजवस्त्रे देण्याचा अधिकार फक्त सातारच्या छत्रपतींकडे राहिला.

महादजी शिंदे यांनी पेशव्यांच्या आज्ञेने इ.स. १७७७ — १७७८ ला कोल्हापूर गादीवर स्वारी केली. त्यात त्यांना चिकोडी व मनोली हे दोन तालुके देणे भाग पडले.[११] पुढील काळात कोल्हापूर गादीला पूर्वेकडून पटवर्धन तर पश्चिमेकडून सावंतवाडीकर सावंत—भोसले यांचा उपद्रव सातत्याने होत राहिला.[१२] याचबरोबर बावडयाचे गडकरी तसेच पावनगड येथेही कोल्हापूरच्या छत्रपतींविरोधात बंड झाले.[१३] ही सर्व बंडे छत्रपतींनी मोडली. अखेरीस तत्कालिन परिस्थितीचा आढावा घेऊन इ.स. १८१२ मध्ये कोल्हापूरच्या छत्रपतींनी इंग्रजांच्या बरोबर तह केला.[१४] कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांचा दिनांक २४ एप्रिल, १८१३ मध्ये मृत्यू झाला.[१५]

इ.स. १८०९ मध्ये कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांची कन्या चिमाबाई आक्का यांचा विवाह पाटण महालाचे श्रीमंत नागोजीराव पाटणकर यांचेशी झाला.[१६] या विवाहाने कोल्हापूर घराणे आणि सरदार पाटणकर घराण्यांत वैवाहिक संबंध प्रस्थापित झाले. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांचे जेष्ठ पुत्र संभाजी महाराज दुसरे ऊर्फ आबासाहेब हे कोल्हापूरचे छत्रपती झाले.[१७] इ.स. १८२१ मध्ये सयाजीराव मोहिते यांनी त्यांची हत्या केली.[१८] कोल्हापूरच्या छत्रपतींनी दिनांक १ ऑक्टोंबर, १८१२

रोजी कंपनी सरकारशी तह केला होता. इ.स. १८१३ ते १८२१ पर्यंत छत्रपती संभाजी महाराज दुसरे ऊर्फ आबासाहेब यांच्यानंतर इ.स. १८२१ मध्ये राजा शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.[१९]

छत्रपती शहाजी महाराज हे इंग्रजद्वेष्टे होते. त्यांनी आपले सैन्य वाढविण्याचा प्रयत्न केला. संधी मिळेल तेव्हा इंग्रजांविरूध्द उठाव करणाऱ्यांसही त्यांनी गुप्त मदत केली. इ.स. १८२४मध्ये कित्तूरला उठाव झाला.[२०] या उठावात कलेक्टर थॅकरे यांचा मृत्यू झाला.[२१] या उठावास छत्रपती शहाजी महाराज यांची गुप्त फूस आहे, असा इंग्रजांचा समज झाला. परिणामी कोल्हापूर राज्यात त्यांनी सैन्य पाठविले. दिनांक ३० डिसेंबर, १८२५मध्ये कंपनी सरकार आणि कोल्हापूरचे छत्रपती यांच्यात नव्याने करार करण्यात आला.[२२] या करारानुसार कंपनी सरकारच्या शत्रूंना कोल्हापूरने कधीही आसरा देऊ नये. गुंडापुंडाचा पाठलाग करून त्यांना चिरडून टाकावे व शांतता राखावी. पण हया तहास मुंबई सरकारने मंजुरी देण्याच्या अगोदर कोल्हापूरच्या राजाने आपली सैन्यसंख्या कमी करावी आणि शांततेस धोका येईल असे काहीच करू नये, अशा दोन अटी जोडण्यात आल्या.[२३] कंपनी सरकारने हा तह दिनांक २४ जानेवारी, १८२६रोजी मंजूर केला.

छत्रपती शहाजी महाराजांनी या तहाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. मोठया प्रमाणात सैन्य भरती सुरू केली. तेव्हा ऑक्टोंबर, १८२७ मध्ये कंपनी सरकारने कोल्हापूरच्या छत्रपतींशी नवा तह केला.[२४] या तहान्वये सैन्यसंख्या कमी करणे आणि कोल्हापूर व पन्हाळगड किल्ल्यांत ब्रिटीश सैन्य ठेवणे या दोन मुख्य अटी छत्रपतींकडून कबूल करविल्या. मनोली व चिक्कोडी हे तालुके खालसा करण्यात आले. संस्थानच्या सैन्यात केवळ ४०० घोडेस्वार व ८०० पायदळ असावे, अशी मर्यादा घालण्यात आली.[२५] विशिष्ट जहागिरदारांच्या संरक्षणाबद्दल पुन्हा हमी देण्यात आली. परंतु अगोदरच्या कराराप्रमाणे छत्रपतींनी या ही कराराकडे दुर्लक्ष केले.

छत्रपती बुवासाहेब महाराज यांच्या कारकिर्दीत राज्यकारभार हा इंग्रजांनी नेमलेल्या कारभाऱ्याच्या सल्ल्यानेच करायचा हे बंधन घातले गेले. तसेच छत्रपतींवर देखरेख करण्यासाठी इंग्रजांची एक पलटणही कोल्हापूरात ठेवण्यात आली होती.[२६] पुढे इंग्रजांचा कोल्हापूरच्या राज्यकारभारातील वाढता हस्तक्षेप छत्रपती बुवासाहेब महाराजांना त्रासदायक ठरला. यातून त्यांनी समकालीन सरदारांशी संधान साधून इंग्रजांविरोधात हालचाल करण्यास सुरूवात केली. इंग्रजांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून कोल्हापूरच्या छत्रपतींना कोल्हापूरच्या तटबंदीत येण्याचीही बंदी घातली. या घटनेने हतबल झालेले छत्रपती तुळजापूरच्या यात्रेस निघून गेले व तिकडेच त्यांचा मृत्यू दिनांक २९ नोव्हेंबर, १८३८मध्ये झाला.[२७]

छत्रपती शहाजी महाराज ऊर्फ बुवासाहेब महाराज यांचा पहिला विवाह सरदार पाटणकर घराण्यातील नागोजीराव पाटणकर यांची कन्या आनंदीबाईसाहेब ऊर्फ ताराबाईसाहेब यांचेशी झाला होता. त्यांना शिवाजी महाराज तिसरे ऊर्फ बाबासाहेब महाराज आणि आऊबाई आक्का ही दोन अपत्ये झाली. तर त्यांचा दुसरा विवाह दिवणाबाईशी झाला होता. त्यांचेपासून त्यांना चिमासाहेब हा पुत्र झाला. दिनांक १८ मार्च, १८४६ मध्ये आऊबाई आक्का यांचा विवाह पाटण घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर यांचेशी झाला. त्यांना इ.स. १८५० मध्ये त्यांना पुत्र झाला त्याचे नाव नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब असे ठेवण्यात आले होते.

छत्रपती बुवासाहेब महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या गादीवर त्यांचे पुत्र शिवाजी महाराज तिसरे ऊर्फ बाबासाहेब महाराज आले.[२८] या काळात कंपनी सरकारने कोल्हापूरच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. छत्रपतींशी झालेल्या तहातील कलमामुळे इंग्रज सरकारने राज्यकारभारात सुधारणा करण्याकरिता दाजी कृष्ण पंडित यास कोल्हापूरचा दिवाण म्हणून नेमले.[२९] तेव्हा कंपनी सरकारच्या या निर्णयाविरोधात

कोल्हापूर राज्यात अंसतोष निर्माण झाला. पुढे याचा स्फोट होऊन इ.स. १८४४मध्ये सामानगडावर गडकरी उठाव झाला.[३०]

मराठा राज्यात किल्ल्यांतील बंदोबस्त गडकरी ठेवीत असत. त्यांना त्याबद्दल तनखा मिळत असे. किल्ल्याच्या जवळपासच्या जमिनी त्यांच्याकडे तनख्यासाठी लावून दिलेल्या असत. ग्रॅन्ट डफने सातारा राज्यातील जमाबंदीस नवीन धर्तीने सुरूवात केली. तीच पध्दती पुढे इतर मराठी संस्थानांत लागू केली. गडकऱ्यांना किल्ला संरक्षणाकरिता जमिनी द्यावयाच्या नाहीत. कारण किल्ल्याचे संरक्षण करण्याकरिता इंग्रजांना गडकऱ्यांच्या नोकरीची गरज नव्हती. मात्र असे करताना त्यांनी या जमिनी गडकऱ्यांजवळ ठेवण्यात आल्या आणि त्यांचा जमीनसारा सरकारजमा करावा, असे ठरविण्यात आले.[३१]

दाजी कृष्ण पंडित यांनी शेतसारा वसुलीसाठी एका मामलेदाराची नियुक्ती केली आणि या मामलेदारामार्फत शेतसारा गडकऱ्यांकडून वसुल केला जाऊ लागला. गडकऱ्यांना ही बाब मान्य नव्हती. कारण हुद्दयाचा विचार करता मामलेदार हा गडकऱ्यांच्या तुलनेत कमी दर्जाचा होता. हा सर्व गडकऱ्यांना अपमान वाटला. तेव्हा त्यांनी कारभारी दाजी कृष्ण पंडित यांचेजवळ तक्रार केली असता, त्यांनी गडकऱ्यांचे म्हणणे ऐकल नाही. तेव्हा सर्व गडकऱ्यांनी आपली तक्रार कोल्हापूरच्या छत्रपतींकडे केली. परंतु आपला काही इलाज नाही, असे सांगून छत्रपतींनी असहाय्य स्थिती व्यक्त केली.

कारभारी आणि गडकरी यांच्यात पेच निर्माण झाला आणि याचा उद्रेक सामानगडावर झाला.[३२] शेतसारा वसुल करण्यास गेलेल्या मामलेदारांस तेथील लोकांनी मारले. हे कारभाऱ्याला कळताच त्यांनी बेळगावहून इंग्रजी सैन्य मागविले. १२०० सैन्याची सुसज्ज तुकडी कॅप्टन औटरॅम याच्या नेतृत्वाखाली सामानगडावर दाखल झाली.[३३] गडकरी आणि ब्रिटीश सैन्य यांच्यात युध्द होऊन गडकऱ्यांचा विजय झाला. यानंतर कारभारी दाजी पंडित यांने गडकऱ्यांची शक्ती क्षीण करण्याचा प्रयत्न चालू केला. यानुसार गडावरील

सर्व तोफा निकामी करण्याचे आदेश दिले.[३४] परंतु गडकऱ्यांनी हा आदेश धुडकावून लावला.

ऑक्टोंबर, १८४४मध्ये उठाववाल्यांनी दाजी पंडित याला कैद करण्यासाठी कोल्हापूर शहराचा ताबा घेतला.[३५] उठाववाल्यांनी पन्हाळा आणि पावनगड हे दोन्ही किल्ले घेतले.[३६] रावजी वाकनीस आणि दिनकरराव गायकवाड यांनी उठाव केला आणि कोल्हापूर शहराभोवती रक्षक ठेवून सर्व दळणवळणावर ताबा मिळविला.[३७] चिकोडीचा खजिना लुटला तसेच तेथील कैद्यांची सुटका केली. सरकारी कागदपत्रे जाळून सरकारी अधिकाऱ्यांना पळवून लावले. कंपनी सरकारने दिनांक १९ सप्टेंबर, १८४४मध्ये गड जिंकण्यासाठी फौज पाठविली. त्यांच्याजवळ चार तोफा, शंभर बंदूकबारदार व दोनशे इतर सैनिक होते.[३८] किल्ल्याच्या तटाला भगदाड पाडून तोफांचे मारे केले. गडकऱ्यांनी तोफांचे मोर्चे उध्वस्त केले. कोल्हापूरहून अपेक्षित मदत न मिळाल्यामुळे गडकरी एकाकी पडले आणि दिनांक १३ ऑक्टोंबर, १८४४मध्ये सामानगड इंग्रज फौजांच्या हाती आला.[३९]

छत्रपती शिवाजी महाराज तिसरे हे अल्पवयीन असल्याने त्यांची माता आनंदीबाई ऊर्फ ताराबाईसाहेब या राज्याची व्यवस्था पाहू लागल्या. त्यांच्या मदतीला सरदार रामचंद्रराव पाटणकर, जीवराव जाधव व मोरोपंत हुजूरबझार हे होते.[४०] परंतु त्यांना विरोध बुवासाहेब महाराजांची दुसरी पत्नी सईबाईसाहेब ऊर्फ दिवाणसाहेब यांनी केला. त्यांचा पक्ष दिनकरराव गायकवाड व रावजी वाकनीस यांनी घेतलेला होता.[४१] म्हणजेच कोल्हापूरच्या गादीचे उघडउघड दोन गट पडलेले दिसून येतात.

छत्रपती शिवाजी महाराज तिसरे यांच्या काळात मेजर ग्रॅहम यांची नियुक्ती कोल्हापूरचे पहिले पोलिटिकल एजंट म्हणून करण्यात आली[४२] व त्यांच्या हाती राज्यांची सर्व अधिकारसूत्रे येऊन अल्पवयी महाराजांना त्यांच्या खासगी खर्चाकरिता दरसाल ८०,००० रूपयांची नेमणूक

करून देण्यात आली.[४३] या दरम्यान छत्रपती बाबासाहेब महाराज यांचे बंधू शाहू ऊर्फ चिमासाहेब यांनी ब्रिटीशांविरोधात उठाव केले, असा ब्रिटीशांना संशय आला. तेव्हा त्यांनी चिमासाहेबांना हद्दपार करून त्यांना कराचीस ठेवण्यात आले.[४४]

इ.स. १८३२ पर्यंत बाबासाहेब महाराजांना आपला काळ केवळ अधिकारविहीन स्थितींत बसून काढावा लागला. मात्र या साली महाराजांशी एक करार करून बऱ्याचशा अटींवर का होईना, महाराजांच्या हातीं राज्याची अधिकारसूत्रे हवाली करण्याचा कंपनी सरकारने निश्चय केला. या कराराचा हेतू महाराजांच्या सत्तेवर गदा आणण्याचा नसून, गतकालीन कोल्हापूरमध्ये जे रक्तपात होत होता व जी बंडाळी माजली होती, तिची पुनरावृत्ती होऊ नये, इतकाच होता.[४५] याच कारणास्तव सरकारने पसंत केलेला कारभारी महाराजांनी नेमावा, खासगी खाते हे संस्थानच्या इतर खात्यापासून अलग ठेवावे, संस्थानच्या सर्व कर्जाची फेड होईपर्यंत कोणालाही नवीन जमीन अगर गांवे इनाम करून देऊ नयेत व कोल्हापूरच्या मांडलिक जहागिरदारांच्या नियमाचा अखेरचा अधिकार कंपनी सरकारच्या हाती असावा, अशा अटी महाराजांवर लादण्यांत आला.[४६] गुन्हेगारांना द्यावयाच्या देहांत शासनाला ब्रिटीश सरकारची मंजुरी घ्यावी आणि विशेष महत्त्वाच्या गोष्टीत महाराजांनी ब्रिटीश सरकारचा सल्ला घ्यावा, असेही याच करारान्वये ठरले.[४७]

वस्तुस्थितीचा विचार करता बाबासाहेब महाराजांच्या आमदनीत पूवीसारख्याच गोष्टींची पुनरावृत्ती होऊन कोल्हापूरच्या इतिहासाला पुन: डाग लागू नये म्हणून या तहांत दक्षता घेतली होती. या कराराच्या काही शर्तींचे जरी समर्थन करतां येण्यासारखे होते, तरी या करारामुळे जहागिरदारांना आपले वर्चस्व वाढविण्याचा मोह झाला. कोल्हापूरच्या छत्रपती महाराजांपासून स्वतंत्र होण्याची त्यांची प्रवृत्ती या तहामुळे बेसुमार वाढली. पेशव्यांचे जहागिरदार शिंदे, होळकर आणि गायकवाड यांनी ज्याप्रमाणे पेशव्यांची सत्ता

झुगारून देऊन स्वातंत्र्य संपादन केले. तसेच करण्याची कोल्हापूरच्या जहागिरदारांना या कराराने संधी आणून दिली. कोल्हापूरच्या जहागिरदारांच्या जहागिरी जरी लहान होत्या तरी पेशव्यांच्या राज्याशीं गायकवाड व होळकर यांच्या जहागिरींचे जे प्रमाण होते. तितकेच कोल्हापूरचे राज्य व कोल्हापूरच्या जहागिरदारांच्या जहागिरी यांच्यामध्ये होते. हा करार झाल्यानंतर थोडयाच दिवसात दिनांक ४ ऑगस्ट, १८६६ मध्ये बाबासाहेब महाराजांचा मृत्यू झाला.[४८]

**छत्रपती राजाराम महाराजः**

**जन्म व बालपणः**

सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर आणि आऊबाई आक्का यांचे पुत्र नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब पाटणकर (जन्म ९ मे, १८५०) हे कोल्हापूर छत्रपती शिवाजी (तिसरे) भोसले महाराज ऊर्फ बाबासाहेब महाराज यांचे जवळ सतत रहात असत.[४९] दिनांक ३० सप्टेंबर, १८६५ रोजी छत्रपती बाबासाहेब महाराजांनी मोठा दरबार भरवून नागोजीराव पाटणकर यांना साडेतीन वस्त्रें देऊन 'मनसूबबहाद्दूर' असा किताब दिला.[५०] छत्रपती बाबासाहेब महाराज आणि चिमासाहेब महाराज यांना संतती नसल्यामुळे छत्रपती महाराजांनी मृत्यूपूर्वी सरदार पाटणकर घराण्यातील आपल्या भगिनी आऊबाई आक्का यांचे पुत्र नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब यांना दत्तक घेतले. या दत्तकविधानानंतर सरदार पाटणकर घराण्यांतील व्यक्तीला छत्रपतीपद प्राप्त झालेले दिसून येते.

**छत्रपतीपदाचा बहुमानः**

छत्रपती बाबासाहेब महाराजांच्या मृत्यूनंतर नागोजीराव हेच कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती राजाराम महाराज असे नामकरण होऊन वारस झाले.[५१] त्यावेळी त्यांचे वय अवघे १६ वर्षे होते. दिनांक २९ ऑक्टोबर, १८६६ रोजी पुण्यात ब्रिटीशांकडून मोठा दरबार भरविण्यात

आला.[५२] ब्रिटीश सरकारकडून छत्रपती राजाराम महाराजांना अधिकार व मानाचा पोषाख देण्यात आला. मुंबईचे गव्हर्नर सर वाल्टर फ्रियर यांनी छत्रपती राजाराम महाराज हे कोल्हापूर गादीचे सातवे छत्रपती म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली.[५३] यावेळी छत्रपतींसोबत त्यांचे कारभारी रावबहाद्दुर रामराव ताडपत्री हे होते.[५४] यावेळी केलेल्या आपल्या भाषणात गव्हर्नर वाल्टर फ्रियर यांनी इंग्रज सरकारच्या नव्या सुधारणांची प्रशंसा, कोल्हापूर राज्याची परिस्थिती व राजाराम महाराजांच्या भावी जबाबदारीची रूपरेषा इत्यादी विषय उल्लेखिलेले होते. गव्हर्नरच्या भाषणानंतर राजाराम महाराजांना पोशाख देण्यात आला व १७ तोफांची सलामी देण्यात आली.[५५] या दत्तकविधानाच्या निमित्ताने सरदार पाटणकर घराण्यांतील व्यक्तीला छत्रपतीपदाची सुसंधी प्राप्त झाली होती. सरदार पाटणकर घराण्यांसाठी ही बाब अत्यंत अभिमानाची व गौरवशाली होती, असे आपणांस दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज ऊर्फ नागोजीराव यांना दत्तक घेतल्याबद्दल सरदार पाटणकर यांच्या घराण्यांचा गौरव समस्त मराठा राज्यामध्ये वाढलेला दिसून येतो. ऐतिहासिक वारसा आणि वसा, गौरवशाली परंपरा, शूर, पराक्रमी, संघटनकुशल या बाबींमुळे खुद्द कोल्हापूरचे छत्रपती बाबासाहेब महाराज यांना या घराण्यांची दखल घ्यावीशी वाटली आणि आपला उत्तराधिकारी म्हणून या घराण्यांतील नागोजीराव पाटणकर यांची निवड केली. या घटनेमुळे मे.अंडरसनसाहेब, माजी पोलिटिकल एजंट यांनी सरकारास रिपोर्ट केल्यावरून दिनांक १० सप्टेंबर, १८६८साली इतर जहागिरदार लोकांकडून सरकारने शेकडा १५ रूपये नजराणा घ्यावा व सरदार पाटणकर यांजपासून शेकडा ५ रूपये घ्यावा, असा ठराव करण्यात आला.[५६] म्हणजेच सरकारनेही या घराण्यांतील नागोजीराव पाटणकर हे कोल्हापूर गादीचे तक्ताधिपती झाल्याचे गौरवार्थ या घराण्याला सरकारास जमा करावयाच्या नजराण्यातून सूट दिलेली दिसून येते.

**शिक्षण:**

छत्रपती राजाराम महाराज गादीवर आल्यानंतर कोल्हापूरच्या राज्यकारभारात अंतर्गत वाद कमी झाला. पण राजाराम महाराज अल्पवयी असल्याने राज्यकारभाराची सर्व सुत्रे ब्रिटीश अधिकाऱ्याच्या हाती गेली. तरीही शिक्षण मिळविण्याची त्यांची जिज्ञासा, राज्यकारभारातील बारीकसारीक गोष्टी समजून घेण्याची त्यांची इच्छा, नव्या परिस्थितीचे ज्ञान मिळविण्यासाठी त्यांनी केलेली धडपड आणि पाश्चात्य रीति—रिवाज समजून घेण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे सर्व पाहिले असता असे दिसून येते की, राजाराम महाराजांना कोल्हापूर राज्याचे परावलंबित्व काढून टाकायचे होते.

छत्रपती राजाराम महाराजांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी पोलिटिकल एजंट अंडरसन यांनी त्यांच्यासाठी एका टयुटरची नेमणूक केली.[५७] त्यांना इंग्रजी शिक्षण व तत्सम चालीरीति शिकविण्यासाठी वेस्ट नावाच्या इंग्रजी अधिकाऱ्याची नेमणुकही करण्यात आली होती.[५८] वेस्ट यांना असिस्टंट एजंट दर्जा दिला होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या शिक्षणासाठी शहराबाहेर एक खास निवासस्थान बांधण्यात आले. तसेच त्यांना शिकविण्यासाठी जमशेटजी नौरोजी ऊनवाला (एम्.ए.) यांची पहिले टयूटर म्हणून नियुक्ती केली.[५९] यातून असे दिसून येते की, छत्रपतींना चांगले शिक्षण मिळावे, यासाठी ब्रिटीशांनी पाऊले उचललेली दिसून येतात.

**विवाह :**

तत्कालिन रीतिरिवाजाप्रमाणे राजाराम महाराजांचा विवाह अल्पवयात झाला होता. त्यांचा पहिला विवाह फलटणचे मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्या कन्येशी म्हणजे ताराबाई साहेबांशी मार्च, १८६७मध्ये झाला होता. या विवाह वेळी ताराबाई या ९ वर्षांच्या होत्या. त्यानंतर त्याच

वर्षी गोपाळराव सरलष्कर यांच्या बहिणीशी म्हणजे सकबारवाईंशी दुसरा विवाह झाला होता. यावेळी सकवारबाई १३ वर्षाच्या होत्या.[६०]

**राज्यकारभार:**

छत्रपती राजाराम महाराज यांनी मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन इंग्रजीतील इतिहास, भूगोल, प्रवास वर्णने या विषयांवरची बरीच पुस्तके वाचून काढली. त्याचबरोबर निरनिराळी इंग्रजी वृत्तपत्रे, मासिकेही त्यांनी वाचून काढली. वेगवेगळया देशात घडणाऱ्या विविध घटनांची माहिती मिळवून ते इंग्रज अधिकाऱ्यांशी घडणाऱ्या घटनांवर चर्चा करताना दिसून येतात. पाश्चिमात्य संगीत, नृत्य त्याचप्रमाणे चालीरीति ही त्यांनी आत्मसात केल्या होत्या. इंग्रजांच्या उत्सवसमारंभामध्ये सहभागी होऊन ते नृत्यही करीत होते.

छत्रपती राजाराम महाराज यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व तसेच शिक्षणाची ओढ यामुळे त्यांचे गार्डीयन वेस्ट यांसबरोबर आठवडयातून काही दिवस नियमितपणे राज्यकारभाराची कामे पहाण्यास सुरूवात केली होती.[६१] दिवाणी व फौजदारी अशा न्यायालयीन कामकाजामध्ये त्यांनी लक्ष देण्यास सुरूवात केली होती. मुलकी खात्याच्या कारभाराची पध्दत समजुन घेण्यावर त्यांनी भर दिला होता. पोलिटिकल एजंट किंवा त्यांच्या हाताखालच्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या कोर्टात चालणारे खटले हे महाराजांनी जवळून पाहिले होते.[६२] जेणेकरून या कामकाजाची त्यांना सवय व्हावी, त्याचबरोबर राज्यकारभाराचे सखोल ज्ञान प्राप्त व्हावे. छत्रपतींची राज्यकारभारातील उत्सुकता आणि आवड लक्षात घेऊन ब्रिटीश सरकारकडून त्यांना लवकरच मुखत्यारी देण्याचा विचारही पुढे आला होता.[६३]

बाबासाहेबमहाराजांच्या शेवटच्या कारकिर्दीतील मुख्य कारभारी रामराव ताडपत्री यांचे निधन पावल्यापासून ती जागा तशीच रिक्त होती. तेव्हा पोलिटिकल एजंट यांनी छत्रपती राजाराम महाराजांशी विचारविनिमय

करून इ.स. १८६९ मध्ये महाराजांना राज्यकारभार करण्यासाठी एक कारभारी व त्याच्या हाताखाली विविध खात्यांचे कारकून यांची नेमणूक करण्यास गव्हर्नरची परवानगी मागितली होती.[६४] कोल्हापूर राज्याचे सर्व हिशोब एक खास दप्तरदार नेमून त्यांचेकडून पूर्ण करवून घेतले होते.[६५] जानेवारी, १८७०मध्ये छत्रपती महाराजांकडे कोल्हापूर संस्थानचे खासगीचे खाते देण्यात आले होते.[६६] खाजगी खात्याच्या कारभाऱ्याने सर्व कारभार महाराजांच्या हुकूमाने करावा, असे ठरविण्यात आले होते.

**छत्रपती राजाराम महाराज यांचे शिक्षणविषयक कार्य:**

कोल्हापूरमध्ये शिक्षण चळवळ उभी रहावी म्हणून तत्कालिन शिक्षणखात्याचा डायरेक्टर ग्रॅंट यांच्या शिफारशीवरून कोल्हापूर इलाख्यासाठी प्रथमच डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरची श्री. बाळ परशुराम पंडित या इंग्रजी विद्याविभूषित व्यक्तींची नेमणूक करण्यात आली.[६७] तसेच चांगले शिक्षक तयार करण्यासाठी एक ट्रेनिंग स्कूल ही स्थापन करण्यात आले.[६८] या सर्व प्रयत्नामुळे इ.स. १८७०मध्ये कोल्हापूर इलाख्यात इंग्रजी—मराठी आणि केवळ मराठी मिळून ३२ शाळा होत्या.[६९] या शाळेत अंदाजे दोन हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर ट्रेनिंग स्कूलमध्ये ५६ विद्यार्थी शिक्षक होते.[७०]

कोल्हापूरमध्ये इंग्रजी शिक्षणाची मागणी वाढू लागल्याने इ.स. १८६७मध्ये पहिल्या हायस्कूलची स्थापना करण्यात आली.[७१] या हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक म्हणून महादेव मोरेश्वर कुंटे यांची नियुक्ती करण्यात आली.[७२] इ.स. १८७० मध्ये या हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २५३ इतकी होती.[७३] एवढया विद्यार्थी संख्येसाठी चांगल्या प्रशस्त इमारतीची आवश्यकता निर्माण झाली.

पुढे कोल्हापूरात असलेली सरदारांची शाळा मोडून काढण्याचा निर्णय मेजर ग्रॅटने घेतला. सरदार व जहागिरदारांच्या मुलांना सार्वजनिक शाळेतच घालावे आणि अशा शाळेत इतर मुलांबरोबर अभ्यास करावा, असे ठरविण्यात आले.[७४] या निर्णयाचा चांगला परिणाम दिसून आला. या हायस्कूलमध्ये इ.स. १८७०मध्ये आठ सरदार व जहागिरदार अभ्यास करीत होते. यामध्ये इचलकरंजीचे घोरपडे आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे मेहुणे सरलष्कर यांचा समावेश होता.[७५] तसेच कोल्हापूरातील इतर शाळांमध्ये वीस सरदार व जहागिरदार शिकत होते. यामध्ये पंत अमात्य बावडेकर आणि महाराजांचे मावसभाऊ कागलकर यांचा समावेश होता.[७६]

**छत्रपती राजाराम महाराजांच्या प्रयत्नाने कोल्हापूरात स्त्री शिक्षणास सुरूवातः**

कोल्हापूरमध्ये स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने त्या काळात पावले उचललेली दिसून येते. इ.स. १८७० पर्यंत कोल्हापूरच्या विविध शाळांमध्ये ६१ मुली शिक्षण घेत होत्या.[७७] छत्रपती घराण्याने या शाळेकडे विशेष लक्ष दिलेले दिसून येते. या शाळेची व्यवस्था पाहण्यासाठी एका समितीची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये महादेव मोरेश्वर कुंटे, जमशेटजी नवरोजी ऊनवाला, बाळ परशुराम पंडित, छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी कारभारी गोविंद अमृत रानडे आणि कोल्हापूरचे सदर अमीन विनायक रघुनाथ काळे यांचा समावेश होता.[७८] महाराजांचे गार्डियन वेस्ट यांच्या पत्नीही या शाळेतील मुलांना शिक्षण देण्याच्या कामी मदत करीत होत्या.[७९]

छत्रपती राजाराम महाराजांशी पोलिटिकल एजंट अंडरसन लहान—मोठया कामात महाराजांनी विचारविनिमय करीत असत. यातून राजवाडयाजवळ हायस्कूल शिक्षणासाठी नव्या पध्दतीची इमारत असावी, अशी कल्पना समोर आली. या कल्पनेसाठी छत्रपती महाराज आणि पोलिटिकल एजंट यांच्यात एकमत झाले. या इमारतीसंबंधीच्या सर्व योजना व पूर्वतयारी वेगाने होत गेली. या इमारतीचे नकाशे आणि अंदाजपत्रक त्यावेळचे मुंबईचे इंग्रज

अभियंता मॅल्ट यांनी तयार केले.[८०] ही इमारत राजस्थानी वास्तू पध्दतीवर बांधण्यात येईल, असे ठरविण्यात आले. दिनांक १५ फेब्रुवारी, १८७० रोजी सायंकाळी साडेपाच वाजता या ऐतिहासिक वास्तूचा पायाभरणी समारंभ महाराजांचे हस्तेच पार पडला.[८१]

या समारंभात छत्रपती राजाराम महाराजांनी इंग्रजी मध्ये भाषण केले. या भाषणात त्यांनी या इमारतीमुळे कोल्हापूर शहराला मोठी शोभा प्राप्त होणार आहे, असे म्हटले.[८२] तसेच शिक्षणामुळे लोकांच्या जुन्या समजुती नाहीशा होतील आणि विद्येचा प्रकाश सगळीकडे पडत जाईल, असे मत त्यांनी मांडले होते.[८३] विद्येस असणारा मान याची साक्ष ही सुंदर इमारत देत जाईल, असे छत्रपतींना वाटत होते. याचा प्रत्यय आजही आपणास राजाराम हायस्कूल पहाताना होतो.

छत्रपती राजाराम महाराजांनी महाराणी व्हिक्टोरिया द्वितीय यांचे चिरंजीव डयूक ऑफ एडिंवरो यांच्या भारत भेटीच्या स्मरणार्थ ४५ हजार रूपयांची देणगी देऊन[८४] त्यातून दरमहा पंचवीस रूपयांच्या सहा शिष्यवृत्त्या देण्याची व्यवस्था केली.[८५] प्रारंभी राजाराम हायस्कूलमधून मॅट्रिकच्या परीक्षेत जे दोन पहिले विद्यार्थी येत असत त्यांना दोन शिष्यवृत्त्या दिल्या जात असत.[८६] नंतर कॉलेज स्थापन झाल्यावर बी.ए. च्या परीक्षेस जाणाऱ्यास १५ रूपयांच्या दोन शिष्यवृत्त्या देण्यात येऊ लागल्या.[८७] याशिवाय दरमहा १० रूपयांच्या सात शिष्यवृत्त्या दिल्या जात.[८८]

**परदेशवारी:**

दिनांक २१ फेब्रुवारी, १८७० रोजी डयुक ऑफ एडिंवरोच्या स्वागत समारंभासाठी छत्रपती राजाराम महाराज मुंबईला गेले.[८९] या स्वागत समारंभासाठी तत्कालिन हिंदुस्थानातील अनेक राजे व सरदार उपस्थित होते. इंग्रजी भाषेचे जाणकार म्हणून छत्रपती राजाराम महाराजांचे खूप कौतुक

झाले. या मुंबई भेटीत महाराजांनी इंग्रज सरकारकडून राज्यकारभाराची मुखत्यारी मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी मुंबईत जवळपास अडीच महिने मुक्काम केला. याच सुमारास छत्रपती महाराजांच्या मनात परदेशी प्रवासाचा विचार अधिक उत्कंटतेने येऊ लागला. त्यामुळे मुखत्यारी घेऊन इंग्लंडचा प्रवास करण्यास जावे की, प्रवासाहून परत आल्यावर मुखत्यारी घ्यावी अशी द्विधा मनस्थिती महाराजांची झाली. यातून इंग्लंड प्रवासाचा बेत पक्का झालेला दिसून येतो.

मुंबई मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांनी इंग्लंडच्या प्रवासाची इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्यांच्या बरोबरील लोकांना आश्चर्य वाटले. कारण हिंदू धर्माच्या रूढीप्रमाणे परदेशगमन निषिध्द मानलेले होते. तसेच एका तरूण छत्रपतींनी अशी इच्छा बाळगणे म्हणजे उघडउघड धर्मसंस्थेला एकप्रकारे आव्हान आहे, असे काहींनी समजले त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी परदेशगमनाची इच्छा बाळगावी ही कल्पनाच आश्चर्यकारक वाटली. पण छत्रपती राजाराम महाराजांचा निश्चय पक्का होता. त्यांनी सर्व अडचणी व विरोध बाजूला सारून परदेशात जाण्याचा निश्चय प्रत्यक्षात उतरविला. त्यावेळच्या गव्हर्नरनी त्यांना, प्रवासाहून परत आल्यावर मुखत्यारी निश्चितपणे दिली जाईल आणि प्रवासात मुखत्यार राजाच्या इतमामाने व्यवस्था ठेवली जाईल, असे आश्वासन देऊन आश्वस्त केले.[१०] थोडक्यात, छत्रपती राजाराम महाराजांनी परदेशगमन करण्याचा जो धाडसी निर्णय घेतला, यामध्ये त्यांना असलेली परदेशी राज्यव्यवस्था, राज्यकारभार, उदयोगधंदे, चालीरीति, शिक्षण, संगीत, नृत्य याबद्दल असलेली त्यांची जिज्ञासा दिसून येते.

दिनांक २२ मे, १८७० रोजी राजाराम महाराज हे सर्व तयारीनिशी प्रवासाला निघाले. त्यांच्यासोबत त्यांचे गार्डियन वेस्ट, त्यांचा पार्शी टयुटर जमशेटजी नौराजी ऊनवाला, गणपतराव ऊर्फ नानासाहेब इंगळे, एक हकिम आणि काही नोकर असे मिळून ११ जण लोक प्रवासाला निघाले.[११]

दिनांक १२ जून, १८७० रोजी महाराज पॅरिसला पोहोचले. दोन दिवस पॅरिस शहरातील प्रेक्षणीय स्थळे पाहून ते ब्रिटीश सामुद्रधुनीतून लंडनला पोहचले. ऑगस्ट, १८७० अखेर त्यांचा मुक्काम लंडन शहरातच होता. दिनांक ३० ऑगस्ट, १८७० रोजी ते स्कॉटलॅडला गेले व तेथून लिव्हरपूलला येऊन पुन्हा दिनांक ७ सप्टेंबर, १८७० रोजी लंडनला गेले. सप्टेंबर आणि ऑक्टोबर या दोन महिन्यात महाराजांचा मुक्काम लंडनमध्ये होता.[९२]

लंडन मुक्कामी छत्रपती महाराजांनी निरनिराळया संस्थांचे व कारखान्यांचे अवलोकन करून खुद्द इंग्लंडचे प्रधान मंडळ व राणीसाहेब यांच्याही भेटी घेतलेल्या दिसून येतात.[९३] जर्मन व इंग्लिश लोकांच्या चालीरीति याविषयी त्यांनी अधिक माहिती घेतलेली दिसून येते. इतिहास प्रसिध्द स्थळे, वस्तुसंग्रहालये, प्राणिसंग्रहालये, रमणीय उद्याने, कलापूर्ण वास्तू, ऐतिहासिक शस्त्रास्त्रे, ग्रंथालये, विद्यापीठे, सामाजिक संस्था, कारखाने, खाणी, ग्रामीण भाग अशा अनेक ठिकाणांना महाराजांनी मुद्दाम भेटी दिल्या.[९४] यातून त्यांची जिज्ञासू वृत्ती आपणांस दिसून येते. तसेच लंडनसारख्या संपन्न आणि आधुनिक शहरात ख्याली खुशालीत रममाण न होता नवे ज्ञान संपादन करण्याची उत्कटता महाराजांच्या ठायी दिसून येते.

**निधन:**

दिनांक १ नोव्हेंबर, १८७०रोजी व्हिक्टोरिया स्टेशनहून महाराज आपल्या सर्व लोकांसह ते परत मायदेशी येण्यास निघाले.[९५] परतीच्या प्रवासात इन्सब्रुक येथे त्यांची प्रकृती बिघडण्यास सुरूवात झाली. कडाक्याची थंडी आणि हिमवर्षाव याचा महाराजांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाला. यावेळी त्यांच्यावर फ्लॉरेन्समधील डॉ. फ्रेझरनी औषधोपचार केले.[९६] अशा आजारी परिस्थितीत ते ठिकठिकांणी रमणीय स्थळे पहात फ्लॉरेन्स या शहरी आले. या ठिकाणी त्यांची प्रकृती अधिक खालावल्याने वयाच्या २०व्या वर्षी म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर, १८७० मध्ये त्यांचे निधन

झाले.[९७] डॉ. फ्रेझरने मृत्यूचे तत्कालिन कारण म्हणून 'Congestion of the abdominal Viscera together with collapse of nervous power' असे सांगितले.[९८]

हिंदुस्थानातील अनेक राजांपैकी परदेशी जाणाऱ्या मोजक्या राजांमध्ये कोल्हापूरच्या छत्रपती राजाराम महाराज यांचा समावेश होतो. त्यांची जिज्ञासूवृत्ती, शिक्षणाची तळमळ, राज्यकारभाराची आवड इत्यादी गुणांमुळे त्यांनी कोल्हापूर राज्याबरोबरच अनेक बाहेरील लोकांना आपलेसे केले होते. त्यांच्या निधनाने कोल्हापूरला नवी दृष्टी, ओळख देणारा प्रजा वात्सल्य छत्रपती कोल्हापूरने गमावला. प्रवासाहून परतल्यावर कोल्हापूर राज्याची मुखत्यारी महाराज स्वत:कडे घेणार होते, हे सर्वांना माहित होते, त्यामुळे कोल्हापूर राज्यातील लोकांना महाराजांच्या निधनाची जास्त हळहळ वाटली. मुंबई येथे गव्हर्नरच्या दरबार निमित्ताने महाराजांचा ज्या संस्थानिकांशी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी परिचय आला होता, त्यांनाही महाराजांच्या मृत्यूने अनपेक्षित धक्का बसला.

तत्कालिन रीतिरिवाजाप्रमाणे इटलीमध्ये शवाचे दहन करण्याची प्रथा नव्हती. ख्रिश्चन धर्मप्रथेमध्ये शव हे दफन केले जाई. पण हिंदू धर्मप्रथेनुसार त्यांच्या शवाचे दहन केले पाहिजे, असे त्यांच्या सोबत असणाऱ्या लोकांना वाटत होते. परंतु या गोष्टीला फ्लॉरेन्सच्या नगरपालिकेकडून परवानगी नाकारण्यात आली.[९९] या पेच प्रसंगातून सुटण्यासाठी महाराजांचा गार्डियन वेस्ट याने इटलीतील ब्रिटीश सरकारचा वकील सर ऑगस्टस यांची भेट घेतली.[१००] पुढे हे प्रकरण इटलीच्या मंत्रिमंडळापर्यंत पोहचले त्या दोघांनी अनेक इटालियन अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्यांना धार्मिक अडचण समजावून सांगितली. यावर इटलीच्या मंत्रिमंडळाने विचार करून शेवटी महाराजांचे शव दहन करण्याची परवानगी दिली.[१०१] हिंदू धर्म शास्त्रानुसार महाराजांचा अंत्यविधी आर्नो नदीच्या काठी केला गेला.[१०२] त्याठिकाणी ३० ते ३५ हजार रू. खर्च करून सुंदर

छत्रीही बांधण्यात आली.[१०३] पुढे राजर्षि शाहू महाराजांनी या ठिकाणास भेट दिलेली दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या इंग्लंडच्या ५ महिन्यांच्या प्रवासातील प्रत्येक दिवसाची दैनंदिनी ठेवली होती. प्रत्येक दिवसाच्या कार्यक्रम ते स्वहस्ते आपल्या डायरीमध्ये इंग्रजीत नोंदवून ठेवत. पुढे त्यांचे गार्डियन वेस्ट यांनी महाराजांची डायरी इ.स. १८७२मध्ये प्रसिध्द केली.[१०४] या डायरीतील नोंदीवरून त्यांच्या मनाचा कल विद्या, कला, शोध इ. कडे किती उत्कंठतेने व्यक्त होत होता, हे दिसून येते.

कोल्हापूरात छत्रपती राजाराम महाराजांना श्रध्दांजली वाहण्यासाठी विशेष जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत अनेक मान्यवरांनी श्रध्दांजलीपर भाषणे केली. याच सभेत कोल्हापूरच्या इंग्रजी हायस्कूलचे मुख्याध्यापक महादेव मोरेश्वर कुंटे यांचेही भाषण झाले. आपल्या श्रध्दांजलीच्या भाषणात ते म्हणाले की, छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रयत्नामुळेच कोल्हापूरचे हे हायस्कूल नावारूपाला आले आहे. म्हणूनच छत्रपती राजाराम महाराजांच्या स्मरणार्थ या हायस्कूलचे नांव ‘राजाराम हायस्कूल’ ठेवण्यात आले.[१०५] श्री. कुंटे यांच्या या मतास सर्वांनी अनुमती दिली. या सभेस सांगली, मिरज, जमखंडी, कुरूंदवाड आणि दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानिक उपस्थित होते.[१०६] ही सभा जमखंडीकरांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या सभेत राजाराम छत्रपती स्मारक समिती नेमून तिने योग्य स्मारकासाठी निधी जमवावा आणि स्मारकाची योजना पूर्ण करावी असे ठरले.[१०७] छत्रपती राजाराम महाराजांना शिक्षणप्रसाराची विशेष आवड असल्यामुळे त्यांच्या स्मारकाचा उद्‌देश जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उत्तेजन मिळण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी असावी असे सभेत मान्य करण्यात आले.[१०८] जो निधी उभा राहील त्याच्या व्याजातून कोल्हापूर हायस्कूल मधील होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे मान्य झाले.[१०९] या सभेत एकूण

आठ हजार रूपये जमा झाले.[११०] सभा अध्यक्ष अप्पासाहेब पटवर्धन जमखंडीकर यांनी तीन हजार रूपये आणि इतर संस्थानिकांनी मिळून पाच हजार रूपये, असे एकूण आठ हजार रूपये जमा झाले होते.[१११]

छत्रपती राजाराम महाराज यांच्या इंग्लंडमधील वास्तव्यात आपल्या स्वभाव गुणधर्मानि अनेकांना आपलेसे केले. त्यांच्या अनाकलनीय मृत्यूची दखल इंग्रजी वृत्तपत्रांनी घेतलेली दिसून येते. लेडी व्हर्नेल्स या नावाच्या एका ब्रिटीश महिलेने या नियतकालिकाच्या जून, १८७१च्या ‘Good Words’ अंकात एक विस्तृत लेख लिहिलेला दिसून येतो.[११२] महाराजांचे आपल्या नोकरलोकांशी प्रेमळपणाचे वर्तन, त्यांनी इंग्लंडला जाताना आपल्याबरोबर गहू, तांदूळ, डाळी इत्यादी धान्ये आणि इतर नेलेले खाद्यपदार्थ, त्यांच्या व नोकरांच्या खाण्यापिण्यात नसलेला भेदभाव, सार्वजनिक ठिकाणी पगडीचा वापर, प्रारंभी त्यांची भपकेबाज राहणी इंग्लंडच्या पंतप्रधान आणि मंत्री यांची राहणी पाहिल्यानंतर बदललेली साधी राहणी याविषयी माहिती मिळते.

छत्रपती राजाराम महाराजांवर पाश्चात्य शिक्षण, कला—कौशल्य, आतिथ्यशीलता, सार्वजनिक कामाविषयी आवड, क्रीडाप्रेम, मनोरंजनाचे विविध प्रकार आणि सामाजिक जीवनातील समजंसपणा याचा प्रभाव पडला होता. या प्रवासात त्यांना स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटल्याने त्यांनी यासंदर्भात अधिक उत्सुकता दाखविली. येथील स्त्रीयांप्रमाणे राजघराण्यातील स्त्रियांनी इंग्रजी शिक्षण मिळविले पाहिजे, असे त्यांचे मत बनलेले दिसून येते.[११३]

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनाची बातमी मुंबई सरकारला कळल्यानंतर सरकारतर्फे दु:ख व्यक्त करण्यात आले. त्यांना त्यांच्या वयाप्रमाणे वीस तोफांची सलामी देण्यात आली.[११४] व्हाइसरॉयकडून दु:ख व्यक्त करणारी तार कोल्हापूरला महाराजांच्या मातोश्रीकडे पाठविण्यात आली. महाराणी व्हिक्टोरियाने डयूक ऑफ आरगाइलच्या मार्फत शोक संदेश

पाठविला.[११५] या संदेशात, 'महाराजांसारखा सुशील व होतकरू राजाच्या हातून आपल्या देशबांधवांचे फार कल्याण झाले असते व त्यात फार महत्त्वाच्या कामी ते उपयोगी पडले असते. त्यांनी पुढे होणाऱ्या राजासा चांगला कित्ता घालून दिला असता. स्वदेशी जाऊन राज्यकारभार हाती घेण्यापूर्वीच ऐन तरूणपणी त्यांच्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली हे वर्तमान ऐकून सर्वास दु:ख झाले आहे', असे म्हटले आहे.[११६]

राजाराम महाराजांचे निधन अतिशय अनपेक्षिरीत्या आणि कोल्हापूरपासून शेकडो मैल दूर युरोपियन देशात झाले. त्यांना पुत्रसंतान नव्हते. त्यामुळे पुन्हा गादीच्या वारसाचा प्रश्न निर्माण झाला. यातून दत्तक घेणे अपरिहार्य होते. पोलिटिकल एजंट अंडरसन यांनी मुलांच्या पसंतीसाठी हालचाल सुरू केली. यात भोसले घराण्यातील सात मुलांची पाहणी करण्यात आली.[११७] खानवट घरण्याचे सावर्डेकर शाखेतील नारायणराव, वय ८ वर्षे यांची निवड करण्यात आली.[११८] दत्तक विधीनंतर त्यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौथे असे नामकरण करण्यात आले.[११९]

छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी सकवारबाई यांनी महाराजांच्या इच्छेनुसार आपले शिक्षण चालू ठेवले. त्यांनी इ.स. १८७७मध्ये राणी व्हिक्टोरियाला एक पत्र लिहिले.[१२०] या पत्रात त्यांनी त्यांची शिक्षणविषयक प्रगती आणि शिवाजी महाराज चौथे यांच्या विवाहाची बातमी दिली. शिवाजी महाराज चौथे आणि त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था केल्याचा उल्लेख या पत्रात आपणास पहावयास मिळतो.[१२१] थोडक्यात, छत्रपती राजाराम महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न महाराणी सकवारबाई यांच्या रूपाने फलित ठरलेले दिसून येतात. यातून छत्रपती राजाराम महाराजांची दूरदृष्टी आपणांस पहावयास मिळते.

**सारांश:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६४५ मध्ये स्वराज्याची स्थापना केली. या स्थापनेनंतर त्यांनी मिळेल त्या साधनसाम्रुगीच्या आधारे बलाढय अशा मुस्लीम सत्ताशी सामना केला. या कामी त्यांना अनेक लोकांनी साथ दिली. तसेच आदिलशाही, मोगल यांसारख्या बलाढय शत्रूच्या तोडीची हत्यारे मराठी लष्करात आल्यावर मराठयांच्या आक्रमणाला एक धार आली. पुढे हा छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या काळातही मराठा लष्कर तेवढयाच प्रखरपणे लढताना दिसते. हा संघर्ष औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच इ.स. १७०७ पर्यंत होता. मोगलांना अविरत २५ वर्षे संघर्ष करूनही मराठा स्वराज्य जिंकता आले नाही. यास कारण की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीबरोबरच प्रत्येकाच्या मनात राष्ट्रप्रेम, शिस्त निर्माण केली.

छत्रपती संभाजी आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यनंतर मराठा राज्याची सर्व जबाबदारी महाराणी ताराबाई यांचेवर आली. त्यांनीही आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर व मुत्सद्दीपणाने ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडलेली दिसून येते. शस्त्र, शौर्यांच्या जोरावर मराठा गादी हस्तगत करता येत नाही, हे पाहून मोगलांनी मराठयांमध्ये भेद पाडून मराठा गादी हस्तगत करता येईल का, याविषयी चाचपणी केली. यातून दिल्लीच्या बादशहाचा प्रतिनिधी म्हणून मराठा साम्राज्याची सूत्रे छत्रपती संभाजी महाराज यांचे पुत्र शाहू महाराजांनी आपल्या हाती घ्यावी, या अटींवर शाहू महाराजांना बंधमुक्त करण्यात आले. हा मोगलांचा डाव महाराणी ताराबाई यांच्या लक्षात येताच त्यांनी शक्य तेवढा शाहू महाराजांना विरोध करण्याचा निश्चय केला. पुढे सत्तासंघर्षात शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्यात युध्द होऊन महाराणी ताराबाईंच्या प्रधानमंडळातील फंदफितुरीने खेडच्या लढाईत शाहू महाराजांचा विजय झाला. या अपयशानंतर महाराणी ताराबाईंनी पन्हाळा किल्ल्यावर आश्रय

घेतला. या डोंगरी किल्ल्यावर तळ देऊन या महाराणी ताराबाई यांनी राज्यकारभार पाहिलेला दिसून येतो.

इ.स. १७३१साली वारणेच्या तहाने कोल्हापूरच्या गादीचे स्वातंत्र्य कबूल करून शाहूंनी कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज पहिले यांच्याशी तह केला. कोल्हापूरची गादी अस्तित्वात आल्यानंतर पेशव्यांनी अनेकदा ही गादी रसातळाला कशी जाईल, याची व्यवस्था केली. तशाप्रकारच्या कारवाया पेशव्यांकडून कोल्हापूर राज्यात करण्यात आल्या होत्या. वारणेच्या तहान्वये कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या दरम्यानच्या सर्व प्रदेशावरील छत्रपती संभाजी महाराज पहिले यांचे प्रभुत्व मान्य केले गेले होते, तरी कोल्हापूरच्या छत्रपतींना पेशव्यांनी या प्रदेशात शांततेने नांदू दिले नाही. छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या राज्याचे प्रदेश बळकविण्याचे काम पेशव्यांनी केले. महादजी शिंदे या पराक्रमी सेनानीने कोल्हापूरवर चढाई करून कोल्हापूरच्या छत्रपतीकडून खंडणी वसूल केली होती.

छत्रपती संभाजी महाराज दुसरे यांचा खून झाल्यानंतर कोल्हापूरच्या गादीला इ.स. १८९४ पर्यंत स्थैर्य नसलेले दिसून येते. या काळात प्रजेबरोबरच राज्यकर्त्यांना ब्रिटीशांचा जाचात रहावे लागले. छत्रपती संभाजी महाराज दुसरे यांच्यानंतर शहाजी ऊर्फ बुवासाहेब कोल्हापूरच्या गादीवर आले. परंतु आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पक्ष उचलणाऱ्या लोकांचा सूड उगविण्याचा मोह छत्रपती बुवासाहेब महाराजांना आवरता आला नाही. छत्रपती बुवासाहेब महाराजांचे जुने शत्रू इचलकरंजीकर घोरपडे, कागलचे जहागिरदार घाटगे हे होते. ब्रिटीश सरकारच्या कानावर या लोकांनी आपली गाऱ्हाणी घातल्यामुळे ब्रिटीशांना कोल्हापूरच्या राज्यकारभारात शिरकाव करण्याची संधी मिळाली. कित्तूरच्या बंडखोरांना मदत करण्याचा प्रयत्न करून व कोल्हापूर संस्थानच्या आसपासच्या ब्रिटीश मुलखांत वरचेवर लुटालूट करून छत्रपती बुवासाहेब महाराज कंपनी सरकारच्या रोषास पात्र झाले. इ.स. १८२६ मध्ये ब्रिटीश सरकार

व संस्थान यामध्ये तह होऊन संस्थानमध्ये व संस्थानच्या बाहेर शांतता राहण्यासाठी छत्रपतींच्या सैन्याची संख्या मर्यादित करण्यात आली. चिक्कोडी व मनोळी हे तालुके छत्रपती बुवासाहेब महाराजांच्या ताब्यात ठेवण्यात आले. परंतु इनामदार व वतनदार लोकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव करू नये, तसेच प्रजेचे जे काही नुकसान होईल ते छत्रपती बुवासाहेब महाराजांनी भरून द्यावे अशा शर्तीवर या दोन तालुक्याचा सुपीक प्रदेश छत्रपती बुवासाहेब महाराजांकडे ठेवण्यात आला. परंतु या शर्तीप्रमाणे छत्रपती बुवासाहेब महाराजांचे वर्तन न घडल्यामुळे हे दोन तालुके ब्रिटीश सरकारने खालसा केले. तसेच छत्रपतींना ब्रिटीश सरकारने पसंत केलेलाच कारभारी नेमणे भाग झाले.

छत्रपती बुवासाहेब महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूर संस्थानात गादीसाठी संघर्ष झालेला दिसून येतो. या काळात ब्रिटीश अधिकारी कोल्हापूरात येऊन राज्यकारभारात कोणतीही ढवळाढवळ न करता कोल्हापूरात स्थिरस्थावर करण्याचा प्रयत्न करत होते. याच काळात दाजी पंडीत यांची नेमणूक संस्थानचा कारभारी म्हणून करण्यात आली. त्याच्याच काळात पन्हाळा, सामानगड, भुदरगड या किल्ल्यावर गडकऱ्यांचे उठाव घडून आले. हे उठाव ब्रिटीशांनी मोडून काढले. पुन्हा असला प्रकार घडू नये म्हणून मेजर ग्रॅहम याची कोल्हापूरचे पोलिटिकल सुपरिन्टेडन्ट पदी नियुक्ती केली. त्याच्या हाती राज्याची सर्व सूत्रे देण्यात आली. छत्रपती बाबासाहेब महाराज अल्पवयीन असल्याने त्यांच्या खाजगी खर्चाकरिता दरसाल ऐंशी हजाराची तरतूद करण्यात आली. छत्रपती बाबासाहेब महाराजांच सावत्रबंधू चिमासाहेब यांनी इ.स. १८५७च्या उठावात सहभाग घेतला होता, म्हणून त्यांची रवानगी कराचीला करून हा उठाव मोडीत काढण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला होता. छत्रपती बाबासाहेब महाराजांच्या काळात कोल्हापूर छत्रपतींचे अधिकार नाममात्र राहिले. तसेच जहागिरदार यांनी छत्रपतीविरोधात उचल खाल्लेली दिसून येते.

छत्रपती बाबासाहेब महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूरच्या गादीचे सरदार पाटणकर घराण्यांतील नागोजीराव ऊर्फ राजाराम महाराज छत्रपती झाले. छत्रपती राजाराम महाराजांना मिळालेल्या अल्पशा कारकीर्दीत कोल्हापूर संस्थानामध्ये शांतता प्रस्थापित केलेली दिसून येते. ब्रिटीशांनी दिलेल्या शिक्षणाचा पुरेपूर वापर करून प्रजेच्या सुखासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी काही योजना आखलेल्या दिसतात. परंतु छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली निधनामुळे या योजनांना मूर्त स्वरूप देता आले नाही. छत्रपती राजाराम महाराजांच्याच काळात कोल्हापूरात शैक्षणिक चळवळ नावारूपाला आलेली दिसून येते. छत्रपती राजाराम महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व जाणल्यामुळे येथील जनतेला चांगले शिक्षण मिळावे, याकडे त्यांनी लक्ष दिलेले दिसून येते.

परदेशात जाऊन तेथील चालीरीती, शस्त्रास्त्रे, कारखाने, खाणी, शिक्षण, बांधकाम, कला, साहित्य या बाबी आत्मसात करण्याच्या हेतू छत्रपती राजाराम महाराजांनी प्रवास केला. छत्रपती राजाराम महाराजंच्या या कृतीमुळे परदेशगमन हे निषिध्द होते, या कल्पनेला छेद देण्यात आला होता. परंतु छत्रपती राजाराम महाराजांनी हा प्रवास कोल्हापूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी योजिलेला होता. या प्रवासात छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या बरोबर असणाऱ्या नोकरवर्गाशी चांगली वर्तणूक केलेली दिसून येते. या प्रवासाच्या दरम्यान छत्रपती राजाराम महाराजांनी दैनंदिन नोंदी ठेवण्यास सुरूवात केलेली होती. त्यामुळे या प्रवासातील विविध ठिकाणच्या भेटीदरम्यान छत्रपती राजाराम महाराजांचा असलेला दृष्टीकोन आपणांस पहावयास मिळतो. स्त्री शिक्षणाविषयी छत्रपती राजाराम महाराजांनी विशेष आत्मीयता दाखवलेली दिसून येते. या प्रवासादरम्यान छत्रपती राजाराम महाराजांचा फ्लॉरेन्स या शहरी दिनांक ३० नोव्हेंबर, १८७० मध्ये मृत्यू झालेला दिसून येतो.

परदेशात प्रवास करून ज्ञानप्राप्ती करून आपली भावी राजवट अतिशय चांगली करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या छत्रपती राजाराम महाराजांचा असा दुर्दैवी अंत झाला. आचार, विचार, अनुभव, शहाणपण आणि महत्त्वाकांक्षा अशा विविध गुणांमुळे छत्रपती राजाराम महाराजांना कोल्हापूरच्या इतिहासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. छत्रपती राजाराम महाराजांना शिक्षणाप्रमाणेच विविध खेळ, शिकार, घोडेस्वारी, निरनिराळया विषयांची चर्चा करणे इत्यादी गोष्टींची विशेष आवड होती, हे आपणांस दिसून येते.

**-: टीपा व संदर्भ :-**

१) रू.क्र.१, पु.क्र.१, पत्र क्र. १३६२०, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

२) कित्ता.

३) कित्ता.

४) डॉ.वि.गो.खोबरेकर, *'महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड (भाग २) १७०७ ते १८१८'*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८, पान नं.९.

५) कित्ता, पान नं. १०.

६) कित्ता, पान नं. ११.

७) कित्ता, पान नं. २७.

८) कित्ता, पान नं. २८.

९) प्रा.डी.डी.चव्हाण, *'क्षत्रिय कुलावतंस चालुक्य–सोळंखी–साळुंखे ऊर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास'*, श्रीराम प्रकाशन, पाटण, सुधारित द्वितीय आवृत्ती, ८ एप्रिल, २०१४, पान नं. १४१.

१०) कित्ता.

११) कित्ता, पान नं. १४२.

१२) कित्ता.

१३) कित्ता.

१४) कित्ता.

१५) कित्ता.

१६) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. ४६८.

१७) कित्ता, पान नं. १४२.

१८) कित्ता.

१९) कित्ता.

२०) डॉ.वि.गो.खोबरेकर, *'महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (इ.स.१८१८ ते १८८४)',* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९४, पान नं. ५६.

२१) कित्ता.

२२) कित्ता.

२३) कित्ता.

२४) कित्ता.

२५) आ.बा.लठ्ठे, *'श्रीमच्छत्रपति शाहुमहाराज यांचे चरित्र',* श्रीरामतत्त्व प्रकाशन, बेळगांव, १९२५, पान नं. १२.

२६) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १४२.

२७) पूर्वोक्त, आ.बा.लठ्ठे, *श्री.शा.यां.च',* पान नं. १३.

२८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १४३.

२९) पूर्वोक्त, आ.बा.लठ्ठे, *श्री.शा.यां.च',* पान नं. १४.

३०) पूर्वोक्त, डॉ.वि.गो.खोबरेकर, *'म.स्वा.ल',* पान नं. ५७.

३१) कित्ता, पान नं. ५८.

३२) कित्ता.

३३) कित्ता.

३४) कित्ता, पान नं. ५९.

३५) कित्ता.

३६) कित्ता.

३७) कित्ता, पान नं. ६०.

३८) कित्ता.

३९) कित्ता.

४०) पूर्वोक्त, आ.बा.लठ्ठे, *श्री.शा.यां.च',* पान नं. १३.

४१) कित्ता.

४२) कित्ता, पान नं. १५.

४३) कित्ता.

४४) कित्ता, पान नं. १६.

४५) कित्ता.

४६) कित्ता.

४७) कित्ता.

४८) कित्ता, पान नं. १८.

४९) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १३९.

५०) कित्ता.

५१) सदाशिव मार्तंड गर्गे, *'करवीर रियासत',* श्री.गो.य.राणे प्रकाशक, पहिली आवृत्ती, जानेवारी १९६८, पान नं. ५८५.

५२) कित्ता.

५३) कित्ता.

५४) कित्ता.

५५) कित्ता, पान नं. ५८६.

५६) ठराव नं. २४३८, मुंबई सरकार.

५७) पूर्वोक्त, सदाशिव मार्तंड गर्गे, *'क.रि.',* पान नं. ५८७.

५८) कित्ता.

५९) कित्ता.

६०) कित्ता.

६१) कित्ता, पान नं. ५८८.

६२) कित्ता.

६३) कित्ता.

६४) कित्ता.

६५) कित्ता.

६६) कित्ता.

६७) कित्ता, पान नं. ५९०.

६८) कित्ता.

६९) कित्ता.

७०) कित्ता.

७१) कित्ता.

७२) कित्ता.

७३) कित्ता.

७४) कित्ता, पान नं. ५९१.

७५) कित्ता.

७६) कित्ता.

७७) कित्ता.

७८) कित्ता.

७९) कित्ता.

८०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १४६.

८१) कित्ता.

८२) पूर्वोक्त, सदाशिव मार्तंड गर्गे, *'क.रि.'*, पान नं. ५९१.

८३) कित्ता, पान नं. ५९२.

८४) कित्ता.

८५) कित्ता.

८६) कित्ता.

८७) कित्ता.

८८) कित्ता.

८९) कित्ता.

९०) कित्ता, पान नं. ५९४.

९१) कित्ता.

९२) कित्ता.

९३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १४७.

९४) पूर्वोक्त, सदाशिव मार्तंड गर्गे, *'क.रि.'*, पान नं. ५९५.

९५) कित्ता, पान नं. ६०१.

९६) कित्ता, पान नं. ६०२.

९७) कित्ता.

९८) कित्ता.

९९) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १४४.

१००) पूर्वोक्त, सदाशिव मार्तंड गर्गे, *'क.रि.'*, पान नं. ६०२.

१०१) कित्ता, पान नं. ६०३.

१०२) कित्ता.

१०३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १४८.

१०४) पूर्वोक्त, सदाशिव मार्तंड गर्गे, *'क.रि.'*, पान नं. ५९५.

१०५) कित्ता, पान नं. ६०५.

१०६) कित्ता.

१०७) कित्ता.

१०८) कित्ता.

१०९) कित्ता.

११०) कित्ता.

१११) कित्ता.

११२) कित्ता, पान नं. ६०३.

११३) कित्ता, पान नं. ६०४.

११४) कित्ता.

११५) कित्ता.

११६) कित्ता.

११७) कित्ता, पान नं. ६०७.

११८) कित्ता.

११९) कित्ता, पान नं. ६०६.

१२०) कित्ता, पान नं. ६०५.

१२१) कित्ता.